**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १९० वा ● गुरुवार ३० नोव्हेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 190 | Date : 30/11/2023 | blow :Thursday | Page 4 | Price 4


## अदृष्य शक्ती मराठा-ओबीसी समाजाला भिडवण्याचे काम करत आहेत : ॲड.आंबेडकर



सांगली : राज्यात अदृष्य शक्ती मराठा आणि ओबीसी समाज भिडवण्याचे काम करीत असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सांगलीमध्ये केला.आज सांगलीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडांगणावर वंचित बहुजन आघाडीची सत्ता संपादन निर्धार सभा झाली. सभेपूर्वी ॲड. आंबेडकर यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, वंचित आघाडी सत्तेत आली तर हमीभाव कायद्याची अंमलबजावणी करेल. तालुका स्तरावरच्या पंचायत समितीला हमी भावाप्रमाणे माल विकला जातो की नाही हे बंधनकारक करून उणिवा आढळल्या तर फौजदारी कारवाईचे अधिकार असतील. कृषी धोरणामध्ये हमी भाव कायद्याची अंमलबजावणी करण्याचे आमचे धोरण राहील. केंद्र शासनाचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील धोरण विचारपूर्वक दिसत नाही. देशातील मुस्लिम समाजाशी ज्या पध्दतीने वागते, त्याच पध्दतीने अन्य राष्ट्राशी वागत असून हाच मापदंड ख्रिश्चन समाजाबाबत असेल तर अमेरिका युरोपबाबत लावला जाणार का? परदेशात राहणार्यांनी केंद्र सरकारला आमचे नातेवाईक का धोक्यात घालता असा सवाल विचारला पाहिजे असेही ते म्हणाले.माध्यमांशी बोलतांना ॲड. आंबेडकर यांनी सांगितले, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळबाबत आपण तीन दिवसांनी सविस्तर भूमिका मांडू. मराठा आरक्षण हा निझामी मराठा आणि रयतेचा मराठा असा लढा असून गेली ७० वर्षे सत्तेत असणार्या निझामी मराठ्यांनी रयतेतील मराठ्यावर अन्याय केला असून मनोज जरांगे-पाटील हे रयतेतला मराठ्यांचे नेतृत्व करीत आहेत. अदृष्य ताकद राज्यात ओबीसी आणि मराठा समाज भिडविण्याचे काम करीत आहे. धनगर समाज आरक्षण मुद्दा पुन्हा आला आहे. ३ डिसेंबर रोजी चार राज्यांचा निकाल हाती येतील, त्यानंतर ६ डिसेंबर नंतर अयोध्या येथून नवी मोहिम हाती घेण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# राज्यात अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानाने अंदाजे ९९ हजार ३८१ हेक्टर क्षेत्र बाधित

## पंचनामे केलेले प्रस्ताव त्वरित सादर करावे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश



मुंबई : गेल्या दोन दिवसात राज्यातील काही जिल्ह्यामध्ये अवकाळी पाऊस,गारपीट यामुळे शेती आणि फळपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानाचे पंचनामे तातडीने करण्याची मागणी शासनाकडे प्राप्त झाली आहे. राज्यातील अवकाळी पाऊस पडलेल्या तालुक्यातील आजपर्यंत प्राप्त प्राथमिक अंदाजे माहितीनुसार ९९ हजार ३८१ हेक्टर बाधित क्षेत्रातील पंचनामे प्रचलित कार्यपद्धती प्रमाणे तातडीने करण्याचे आदेश सर्व जिल्हाधिकारी यांनी सर्व क्षेत्रीय यंत्रणांना द्यावेत व ३३ टक्के पेक्षा जास्त शेती पिकांचे नुकसान झालेल्या प्रकरणी निधी मागणीचा प्रस्ताव लवकरात लवकर शासनाकडे पाठविण्याची व्यवस्था करावी असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

२६ नोव्हेंबर रोजी अवकाळी पाऊस,गारपीट यामुळे शेती आणि फळपिकांच्या बाधित क्षेत्राबाबत आज दिनांक २८ नोव्हेंबर २०२३ रोजी कृषी विभागाकडून प्राप्त प्राथमिक अंदाजे माहितीनुसार ठाणे जिल्ह्यातील शहापूर, मुरबाड हे तालुके बाधित असून यातील ५३ हेक्टर क्षेत्रातील भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे.,पालघर जिल्ह्यातील पालघर, वसई व डहाणू तालुक्यातील ४१ हेक्टर क्षेत्रातील भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे, नाशिक जिल्ह्यातील कळवण, नांदगाव, नाशिक, निफाड, त्र्यंबकेश्र्वर, सटाणा, दिंडोरी, पेठ, सुरगाणा, इगतपुरी, सिन्नर,चांदवड, येवला तालुक्यातील ३२ हजार ८३३ हेक्टर क्षेत्रातील कांदा, द्राक्ष, सोयाबीन, मका, गहू, ऊस व फळपिके, धुळे जिल्ह्यातील साक्री, शिरपुर, शिंदखेडा तालुक्यातील ४६ हेक्टर क्षेत्रातील केळी, पपई, कापूस, हरभरा, नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर, अक्कलकुवा, नंदुरबार, शहादा, तळोदा, अक्राणी तालुक्यातील २ हजार २३९ हेक्टर क्षेत्रातील भात, कापूस, तूर, मिरची, मका, कांदा पिकांचे, जळगाव जिल्ह्यातील जळगाव, भुसावळ, यावल, रावेर, मुक्ताईनगर, अमळनेर, चोपडा, एरंडोल, पारोळा, चाळीसगाव, जामनेर, पाचोरा, धरणगाव, बोदवड, भडगांव । पान २वर

## मी लेचापेचा नाही, राजकीय आजारपणाच्या टीकेवर अजित पवारांचं चोख प्रत्युत्तर



रायगड : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांना काही दिवसांपूर्वी डेंग्यूची लागण झाली होती. त्यामुळे बरेच दिवस ते सक्रिय राजकारणातून बाहेर होते. त्याच काळात मराठा आंदोलन पेटले होते. तसंच, अनेक महत्त्वाचेही मुद्दे चालू होते. या प्रकरणी अजित पवारांची कोणतीही राजकीय प्रतिक्रिया न आल्याने पवारांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले. यावरून, अजित पवारांनी आता सडेतोड उत्तर दिलं आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे आयोजित केलेल्या निर्धार सभेत ते बोलत होते.

सध्या विविध जाती-जातीत वाद सुरू असून प्रत्येकाला आरक्षण हवंय. कोणावरही अन्याय होणार नाही. इतरांना दिलेल्या आरक्षणाला धक्का न लागता राहिलेल्यांना संधी मिळाली पाहिजे अशी भूमिका सर्वपक्षीय बैठकीत घेण्यात आली, असं अजित पवार म्हणाले. पुढे ते म्हणाले की, एखाद्याचे विचार। पान २वर

## सोलापुरात अवकाळी पावसाने नाल्यात तरूण गेला वाहून; पिकांची प्रचंड हानी





सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर शहर व जिल्ह्यात सर्वत्र जोरात पडलेल्याअवकाळी पावसामुळे शहरात नाल्यामध्ये वाहून गेल्याने एका तरूणाचा मृत्यू झाला. तर दुसरीकडे ग्रामीण भागात ज्वारीसह मका, गहू, द्राक्षे व अन्य पिकांची प्रचंड हानी झाली. त्यामुळे शेतकरी आणखी अडचणीत सापडला आहे. शहरात झालेल्या धुंवाधार पावसामुळे कुंभार वेस भागातील नाल्यात सलाम साबीर दलाल (वय ३५, रा. जोडभावी पेठ, सोलापूर) हा तरूण वाहून गेला. त्याचा मृतदेह सापडला आहे. पहाटेच्या सुमारास अवकाळी पावसाचा जोर वाढला असताना पाऊस अंगावर झेलत सलाम दलाल हा दुचाकीने घरी परत येत होता. परंतु कुंभार वेशीतील नाल्यातून पाणी रस्त्यावर आले असताना दुचाकी । पान २वर

## राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून नागपूरमध्ये होणार

मुंबई : राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे गुरुवार दि. ७ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२३ या कालावधीत होणार आहे.विधानभवन येथे आज विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. यावेळी नागपूर येथे होणाऱ्या अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा झाली.या बैठकीला विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विविध विभागाचे मंत्री, दोन्ही सभागृहाचे सदस्य, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे संबंधित मान्यवर उपस्थित होते.हिवाळी अधिवेशन गुरुवार दि ७ डिसेंबर २०२३ ते बुधवार दि.२० डिसेंबर २०२३ या कालावधीत घेणार आहे. हिवाळी अधिवेशनाचे एकूण दिवस १४ असून, यामध्ये प्रत्यक्ष कामकाज १० दिवस, तर सुट्या (शनिवार व रविवार मिळून) ४ दिवस आहेत.

## योग हा व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग : राष्ट्रपती




पुणे : योग हा व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग असून शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक आणि अध्यात्मिक उत्कृष्टतेचे माध्यम म्हणून योग प्रणाली प्रभावी मानली जाते, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज येथे केले.

लोणावळा येथील कैवल्यधाम योग संस्थेचा शताब्दी सोहळा आणि 'शालेय शिक्षणात योगाचे एकत्रीकरण' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात राष्ट्रपती श्रीमती मुर्मू बोलत होत्या.कार्यक्रमास राज्यपाल रमेश बैस, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, माजी केंद्रीय मंत्री तथा शताब्दी समितीचे अध्यक्ष सुरेश प्रभू, कैवल्यधामचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश तिवारी, सचिव सुबोध तिवारी आदी उपस्थित होते.

स्वामी कुवलयानंद यांनी स्थापन केलेल्या 'कैवल्यधाम'च्या शताब्दी सोहळ्याच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित राहून आनंद झाला, असे सांगून राष्ट्रपती श्रीमती मुर्मू म्हणाल्या की, भारताचे योग शिक्षण ही जागतिक समुदायासाठी आपली अमूल्य देणगी आहे. भारताच्या पुढाकाराने संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. योग प्रणाली ही आरोग्य आणि कल्याणासाठी सर्वांगीण दृष्टिकोन प्रदान करते आणि ती संपूर्ण जागतिक । पान २वर






# कुरनूर ते सोलापूर बससेवेला बुधवार पासून झाला उत्साहात प्रारंभ, ग्रामस्थांनी केले लालपरीचे जोरदार स्वागत

## सरपंच व्यंकटदादा मोरे यांच्या प्रयत्नाला मोठें यश



अक्कलकोट/महेश गायकवाड : कुरनूर ते सोलापूर बससेवेला आज बुधवार दिनांक २९ नोव्हेंबर २३ पासून उत्साहात प्रारंभ झाला सोलापूर येथुन आज सकाळी पहिली बस कुरनुर गावांत पोहचताच ग्रामस्थांनी लालपरीचे जोरदार स्वागत केले, सरपंच व्यंकटदादा मोरे यांच्या प्रयत्नाला यश आल्यामुळे आज गावकरी मोठया खुशीत आणि आनंदात होते, गेल्या अनेक दिवसापासून कुरनूर ते सोलापूर अशी बससेवा सुरु करण्याची सातत्याने मागणी कुरनूर ग्रामपंचायतचे सरपंच व्यंकट दादा मोरे आणि ग्रामस्थांकडून केली जात होती. अखेर या मागणीला आज यश आले आहे. आज गावांत सकाळी एस टी बस पोहचल्या वर प्रारंभी गावकऱ्यांनी एस टी चे जोरदार स्वागत केले या नंतर एस.टी ची पुजा सरपंच व्यंकटदादा मोरे यांच्या हस्ते असंख्य ग्रामस्थांच्या उपस्थितीत करण्यात आली, सरपंच व्यंकटदादा मोरे यांच्या हस्ते एस टी च्या श्रमहामंडळ चालक आणि वाहक यांचा फेटा बांधून व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला, या बससेवेमुळे शेतकरी, विद्यार्थी, रुग्ण आणि प्रवासी यांची सोय होणार आहे. तसेच मराठवाड्यात जाण्यासाठी या बससेवेचा लाभ होणार आहे. आता खेड्यातील विद्यार्थ्यांना सोलापुरात शिक्षण घेणे सोयीचे झाले आहे. ही बस सोलापूर - इटकळ -केशेगाव - निलेगाव -हन्नूर-चुंगी आणि कुरनूर अशी धावणार आहे. यासाठी विनोदकुमार भालेराव (विभाग नियंत्रक सोलापूर विभाग.) अजय पाटील-(विभागीय वाहतूक अधिकारी सोलापूर विभाग), उत्तम जुंदळे, (आगार व्यवस्थापक रा.प.सोलापूर) र्यिा अधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले आहेत. आज बुधवार पासून सुरु झालेल्या या बससेवेमुळे कुरनूर ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे. कुरणुर चे ग्रामदैवत पिर सातू सय्यद बाबा यांची जत्रा आज पासुन सुरु झाली आहे त्यामुळे गावकरी मोठया आनंदात होते,

कुरनूर गावातील लोकसंख्या ही ४५०० असून गावात विद्यार्थी व मजुरांची संख्या खूप आहे. विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणासाठी सोलापूरला जाणेकरिता अक्कलकोट मार्गे जावे लागते. यामध्ये विद्यार्थ्यांचा बराच वेळ वाया जातो व त्यांना अक्कलकोट वरुन वेळेत गाडी न मिळाल्यास त्यांचे शेक्षणिक नुकसान होत आहे. सदर बस सेवा सुरु झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शेक्षणिक नुकसान टळणार आहे.

कुरनूर येथे बोरी मध्यम प्रकल्प असल्याने बागायतदार शेतक-यांची संख्या जास्त आहे. शेतीत तयार होणारा शेत-माल (भाजीपाला व फळे) विक्रीसाठी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे नेण्यासाठी दुसरी कोणतेही पर्यायी व्यवस्था नाही. सदर बस सेवा चालू झाल्याने शेतकऱ्यांचा आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी सहकार्य होईल. कुरनूर गावची लोकसंख्या ४५०० इतकी असताना देखील गावामध्ये वैद्यकीय सेवा अपुरी आहे. रुग्णांना दवाखान्यात उपचार घेण्यासाठी अक्कलकोटशिवाय दूसरा पर्याय नाही. सदर बस सेवा सुरू झाल्याने रुग्णांना सोलापुरातील चांगल्या व दर्जेदार प्रकारच्या वैद्यकीय सेवांचा लाभ घेता येणार आहे.

कुरनूर गावातील अनेक कुटुंबाचे पै-पाहुणे व नातेवाईक हे मराठवाड्याकडील आहेत. या लोकांना आपल्या पाहुण्यांना भेटण्यासाठी अथवा कार्यक्रमासाठी जाणेकरिता अक्कलकोट वरुन वळसा मारून जावे लागते. सदर बस सेवा सुरू झाल्याने प्रवाशांचा वेळ आणि आर्थिक नुकसान टळणार आहे.

> सोलापूर ते कुरनुर एस टी बस सूरू व्हावी म्हणून अपण सातत्याने प्रयत्न करीत होतो ग्रामस्थांच्या मागणीचा सतत पाठपुरावा केला आणि सोलापूर ते कुरनुर ही एस टी सूरू केली आहे आज मला आनंद आहे की, आमच्या गावचे ग्रामदैवत पिर सातू सय्यद बाबा यांच्या यात्रे पासुन ही एस टी बस सूरू झाली आहे,
>
> **- व्यंकटदादा मोरे सरपंच ,ग्रामपंचायत, कुरनुर**

## संपादकीय

# दुधाच्या भेसळीकडे दुर्लक्ष

दुधात भेसळ होत असल्याची कबुली दस्तुरखुद्द दुग्ध विकासमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनीच दिली आहे. राज्यात ३० टक्के दुधात भेसळ होत असल्याची माहिती त्यांनी दूध उत्पादकांच्या मुंबईत झालेल्या बैठकीत दिली. दूध भेसळ शोधण्याची जबाबदारी खरे तर अन्न व औषध प्रशासन विभागाकडे आहे, परंतु अशी भेसळ शोधण्यात प्रशासनाला अपयश आल्यामुळे आता भेसळ रोखण्याचे काम दुग्ध विकास विभागावरच सोपवण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. दुग्ध विकास मंत्र्यांना अचानक दुधाची भेसळ कशी पुढे आणाविशी वाटली? दूध भेसळीचे खापर अन्न व औषध प्रशासनावर फोडून भेसळ शोधण्याचे अधिकार स्वत:च्या विभागाकडे घेण्याची ही चाल आहे? असेही प्रश्न उपस्थित होत आहेत. दुधातील भेसळ रोखण्यात प्रशासनाला अपयश येण्याचे मूळ कारण आहे या विभागातील मनुष्यबळाचा अभाव. या विभागात प्रथम श्रेणी अधिकाऱ्यापासून ते चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपर्यंतची ३५ टक्के पदे रिक्त असल्यामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांमध्ये जमेल तशी कारवाई करण्यात येते. ही पदे भरल्यास दूध भेसळीला बऱ्यापैकी चाप बसेल, पण 'जखम मांडीला आणि मलम शेंडीला' अशीच सरकारी कार्यपध्दती आजवर राहिली आहे. मुळात भेसळयुक्त दूध मिल्को मीटरच्या साहाय्यानेसुध्दा ओळखता येणे कठीण जाते, पण तरीही याचे खापर वजन मापन वैधता विभागावर फोडत मिल्को मीटरची तपासणी करण्याचेही काम दुग्ध विकास विभागाकडे ओढण्याचा घाट घातला जात आहे. दुधाची भेसळ शोधणारे खाते हे 'मलईदार खाते' म्हणूनही ओळखले जाते. अशा प्रकारचे भेसळयुक्त दूध शोधले जाते तेव्हा बऱ्याचदा संबंधितांवर कारवाई होताना दिसत नाही. त्यामागील 'अर्थ' काय असतो हे दूध उत्पादकांना चांगलाच ठाऊक असतो. या 'मलईदार' कामालाही आपल्या दुग्ध विकासाला जोडण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. दूध उत्पादकांची बैठक घेण्यामागचे प्रमुख कारण होते दुधाचे दर. सरकारने जाहीर केल्याप्रमाणे ३४ रुपये दुधाला दर देण्यास दूध कंपन्यांनी नकार दिला. सरकारने काढलेला दूध आदेश दर कंपन्यांनी धुडकावून लावल्याने या बैठकीत केवळ सारवासारव करण्यात आली. दूध उत्पादकांच्या लेखी सरकारच्या आदेशाची किंमत रद्दीसारखीच आहे. त्यामुळे राज्यभरातील दूध संकलन केंद्रांवर सरकारच्या आदेशाची होळी करण्याचे आवाहन दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने करण्यात आले आहे. अर्थात दूध उत्पादक संघ जरी दुधाच्या दरावर अडून असला तरीही दुधाच्या भेसळीकडे दुर्लक्ष करताच येणार नाही.

# पर्यावरण जतनाला शासनाचे प्राधान्य

पर्यावरणाचे जतन करून वातावरणात होणारे बदल रोखण्यासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. जागतिक स्तरावर यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. भारताने देखील यासाठी पुढाकार घेतला असून महाराष्ट्र शासनाच्या २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात पर्यावरण व वातावरणीय बदल विभागांतर्गत विविध योजनांसाठी २२४ कोटी रूपयांची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

वातावरणीय बदलांमुळे होणारे दुष्परिणाम हा कळीचा मुद्दा ठरत आहे. यामुळे नैसर्गिक आपत्तींमध्ये होणाऱ्या वारंवारितेत वाढ होताना दिसून येत आहे. राज्याचा पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यावर उपाययोजना करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. राज्यात 'माझी वसुंधरा' अभियानाच्या अंमलबजावणीमध्ये सर्व घटकांचा सहभाग वाढत असून या अभियानासाठी शासनाने १०० कोटी रूपयांचा निधी प्रस्तावित केला आहे. राज्यातील नद्यांना प्रदुषणापासून वाचविण्यासाठी त्यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. या योजनेसाठी ४५ कोटींचा निधी प्रस्तावित असून राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेसाठी सुमारे ६० कोटींचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

याव्यतिरिक्त पर्यावरण विषयक माहिती प्रणाली केंद्र, पर्यावरणविषयक जनजागृती, शिक्षण व वातावरणीय बदल कृती कार्यक्रम, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ?थॉरिटी, ई-गव्हर्नन्स आदींसाठी देखील भरीव तरतूद करण्यात आली असून राज्याच्या विविध योजनांसाठी एकंदरीत २२४ कोटी रूपयांचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

अर्थसंकल्पीय उद्दिष्टांनुसार राज्याचे 'नेट झिरो उत्सर्जन' साध्य करण्यासाठी उपाययोजना



करण्यात येणार आहेत. राज्याचा मुख्यत: हरित ऊर्जा क्षेत्रावर भर असून त्याकरिता सौर, जल व पवन ऊर्जा या क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीचे ३० हजार कोटींचे सामंजस्य करार करण्यात आलेले आहेत. हरित हायड्रोजन, हरित अमोनिया, सौर व पवन ऊर्जा या क्षेत्रात ७५ हजार कोटी रूपयांची 'हरित' गुंतवणूक अपेक्षित आहे.

हवामान बदलांच्या समस्यांचा मुकाबला करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रीन बॉन्ड मधून १६ हजार कोटी रुपये उभारण्याचे ठरविले आहे. राज्यासाठी सन २०२४ पर्यंत पाच हजार कोटी रूपये ग्रीन बॉन्ड मधून उभारण्यात येतील. त्यामधून नवीकरणीय ऊर्जा, हरित इमारती, हरित हायड्रोजन, इलेक्ट्रिक मोबिलिटी व चार्जिंग सुविधा इत्यादी उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत.

राज्यातील ग्रामपंचायतींचे पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी २० हजार ग्रामपंचायतीत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येतील. तर, भुसावळ येथे ५०० किलो वॅट सौर ऊर्जेचा वापर करून २० घनमीटर प्रती तास हरित हायड्रोजन निर्मिती करण्यात येईल. महाराष्ट्राच्या समुद्रकिनाऱ्याला समुद्रीतृण आणि शैवाळयुक्त समृद्धी लाभली आहे. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी, सांडपाणी प्रक्रिया, जैवइंधन तसेच औद्योगिक वापरात या शैवाळाची उपयुक्तता लक्षात घेता शैवाळ शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी अभ्यासगट स्थापन करण्यात येणार आहे. तर जायकवाडी येथील नाथसागर जलाशयात तरंगत्या सौर ऊर्जा पॅनलद्वारे वीज निर्मिती करण्यात येईल.

शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक उपक्रमांच्या मालकीची १५ किंवा त्यापेक्षा जास्त वर्षे जुनी वाहने निष्कासित करण्यात येत आहेत. तर, खाजगी वाहनांना आठ व १५ वर्षांच्या आत स्वेच्छेने निष्कासित केल्यास नवीन वाहन खरेदीसाठी कर सवलत देण्यात येईल. राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात पाच हजार १५० इलेक्ट्रिक बसेसचा समावेश करण्यात येणार आहे. राज्यात चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारण्यात येणार आहे. तसेच पाच हजार डिझेल बसेसचे द्रवरूप नैसर्गिक वायू इंधनावरील वाहनांमध्ये रूपांतर करण्यात येईल.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये 'पर्यावरण सेवा योजना' १२ जिल्ह्यांमधील ५० शाळांमध्ये सुरू आहे. या योजनेची व्याप्ती वाढवून येत्या पाच वर्षात सात हजार ५०० शाळांमध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी पर्वाचे औचित्य साधून सरोवर संवर्धन योजनेंतर्गत नव्याने ७५ तलावांचे पर्यावरणपूरक संवर्धनाचे काम हाती घेण्यात येईल. तसेच अमृत सरोवर निर्मितीची योजना १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत पूर्णत्वास नेण्यात येईल.

प्रत्येक शहरात धार्मिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण औषधी वृक्षांची 'अमृत वन उद्याने' तयार करण्यात येतील. ग्रामीण भागात पर्यावरणपूरक कडूनिंब, वड, उंबर, देशी आंबा व बेल या पाच वृक्षांच्या लागवडीतून 'पंचायतन' निर्माण करण्यात येईल. तर, धार्मिक स्थळांच्या परिसरात देवराई तयार करण्यात येतील. औषधी, शोभिवंत व व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाच्या वृक्ष प्रजातींच्या प्रमाणित रोपांच्या निर्मितीसाठी ५० हायटेक रोपवाटीकांची स्थापना करण्यात येईल. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा प्राणी संग्रहालयात आफ्रिकन सफारी व पक्षी उद्यान येत्या वर्षी सुरू करण्यात येणार आहे. तसेच जुन्नर तालुक्यात शिवनेरी येथे बिबट सफारी सुरू करण्यात येईल.एकंदरीतच पर्यावरणाच्या जतनाला शासनाचे प्राधान्य असून त्यादृष्टीने अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे.

पान १ वरुन

## राज्यात अवकाळी पावसाने झालेल्या

तालुक्यातील ५५२ हेक्टर क्षेत्रातील कांदा, हरभरा, गहू, मका, ज्वारी व फळपिकांचे नुकसान झाले.

अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर, अकोले, कोपरगाव, पारनेर, राहता येथील १५ हजार ३०७ हेक्टर क्षेत्रातील केळी, पपई, मक्याचे नुकसान झाले आहे. पुणे जिल्ह्यातील खेड, आंबेगाव, शिरुर तालुक्यातील ३ हजार ५०० हेक्टर क्षेत्रातील द्राक्ष,कांदा पिकांचे नुकसान झाले आहे, सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील १५ हेक्टर क्षेत्रातील भात पिकाचे नुकसान झाले आहे., छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील संभाजीनगर, पैठण, गंगापूर, वैजापूर, कन्नड, खुलताबाद, सिल्लोड, सोयगाव आणि फुलंब्री तालुक्यातील ४ हजार २०० हेक्टर क्षेत्रातील केळी, पपई व मका पिकांचे नुकसान झाले आहे.

जालना जिल्ह्यातील बदनापूर,जालना,जाफ्राबाद तालुक्यातील ५ हजार २७९ हेक्टर क्षेत्रातील द्राक्ष, केळी, कांदा, खरीप ज्वारी, गहू व हरभरा पिकांचे नुकसान झाले आहे, बीड जिल्ह्यातील परळी, बीड तालुक्यातील २१५ हेक्टर क्षेत्रातील कांदा, ज्वारी, भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे, हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील १०० हेक्टर क्षेत्रातील भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे, परभणी जिल्ह्यातील परभणी, गंगाखेड, जिंतूर, पाथरी, पूर्णा, पालम मानवत सोनपेठ, सेलू तालुक्यातील १ हजार हेक्टर क्षेत्रातील रब्बी ज्वारी, कापूस, सीताफळ, पेरू, भाजीपाला या पिकांचे नुकसान झाले आहे, नांदेड जिल्ह्यातील नांदेड, मुदखेड तालुक्यातील ५० हेक्टर क्षेत्रातील केळी पिकाचे नुकसान झाले आहे, बुलढाणा जिल्ह्यातील बुलडाणा, नांदुरा, लोणार, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, संग्रामपूर, मेहकर, जळगाव जामोद., मलकापूर, खामगाव, शेगाव, मोताळा, नांदूरा तालुक्यातील ३३ हजार ९५१ हेक्टर क्षेत्रातील भाजीपालाचे नुकसान झाले आहे. नुकसान झालेले क्षेत्र हे प्राथमिक अंदाजानुसार आहे. नुकसान झालेल्या क्षेत्रांचे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी वेळेत सादर करावेत अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केल्या आहेत.

## मी लेचापेचा नाही, राजकीय

पटले नाहीत तर विचारांची देवाण-घेवाण होऊ शकते. मध्ये मला डेंग्यु झाला. मला विकनेस आला होता. डॉक्टरांनी मला काळजी घ्यायला सांगितली होती. त्या पद्धतीने मी काळजी घेतली. पण अनेकांनी म्हटलं की अजित पवारांना राजकीय आजार झाला. मी काही लेचापेचा राहिलो नाही राजकीय आजार व्हायला. जे काही आज असेल ते तोंडावर बोलणारा माणूस आहे.

अजित पवार म्हणाले की, मधल्या काळात काही राजकीय बदल झाले. त्याबाबत बराच उहापोह झाला. सगळ्यांना सांगायचं आहे की, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा आणि शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा आणि स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांच्या विचारांवर चालणारा हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. या जिल्ह्यात समुद्रकिनारा आहे. डोंगराळ भाग आहे. नागरिकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. रेल्वे गेली आहे. रस्त्यांचं जाळं निर्माण झालं आहे. पनवेलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचं विमानतळ व्हावं. अनेक महतत्वाच्या भागांना जोडणारं काम होत आहे. पुणे, नगर जिल्ह्यांतून घाटातून येताना लोकांना त्रास होतो. तेथेही काही व्यवस्था करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. इथल्या लोकांना रोजगार निर्माण झाला पाहिजे.

## सोलापुरात अवकाळी पावसाने

घसरल्याने सलाम दलाल हा कोसळला.पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने प्रवाहासोबत तो वाहून गेला आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला. मृत सलाम दलाल यास तीन महिन्यांच्या तान्हुल्या बाळासह तीन मुले असून ती अनाथ झाली आहेत. मुंबईत झालेल्या २६/११/ च्या दिवशी दहशतवादी हल्ल्यात त्याचे वडील साबीर दलाल हे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर दहशतवाद्याची गोळी लागल्याने जखमी झाले होते. या घटनेस दोनच दिवसांपूर्वी १४ वर्षे पूर्ण झाली होती. काही महिन्यापूर्वी त्यांचाही मृत्यू झाला होता. त्यांच्या पश्र्चात कुटुंबातील कर्ता असलेल्या सलाम याचाही अवकाळी पावसाने बळी घेतल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## योग हा व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचा

समुदायाच्या आरोग्यासाठी लाभदायक आहे, असे संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने स्पष्ट केले आहे.त्या पुढे म्हणाल्या की, योगाच्या अमूल्य ज्ञानाचा मुलांना आणि तरुण पिढीला लाभ व्हावा या उद्देशाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भारतीय ज्ञान परंपरेत असलेल्या योग ज्ञानाला शिक्षण व्यवस्थेत महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. प्राचीन भारतातील गुरुकुलमध्ये शिकणारे विद्यार्थी, बौद्धिक ज्ञान तसेच अध्यात्मिक ज्ञानाच्या मार्गावर मार्गक्रमण करत असत. आपल्या विद्यार्थ्यांना भारताच्या प्राचीन परंपरेच्या उपयुक्त घटकांशी जोडणे हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा एक महत्त्वाचा पैलू आहे.

भारतीय परंपरेत कैवल्य म्हणजेच मोक्ष हा सर्वोत्तम प्रयत्न मानला जातो. अर्थ, काम आणि धर्म या पायऱ्या पार करून माणसाला कैवल्य प्राप्त करायचे असते. व्यावहारिक ज्ञान आणि आध्यात्मिक ज्ञान एकमेकांना पूरक असल्याचे इश उपनिषदात स्पष्ट केले आहे. समग्र शिक्षणामध्ये व्यावहारिक आणि अध्यात्मिक ज्ञानाची सांगड घातली जाते.

योगाची शिस्त कैवल्यप्राप्तीसाठी उपयुक्त आहे हे सत्य आपल्या ऋषीमुनींनी प्राचीन काळी विस्तृत संशोधन आणि चाचण्यांनंतर मांडले होते.

महर्षी पतंजली यांनी योगसूत्रात योगविषयी महत्वपूर्ण संशोधन संकलित केले. विसाव्या शतकात स्वामी कुवलयानंद यांच्यासारख्या महान व्यक्तींनी योगपद्धतीची वैज्ञानिकता आणि उपयोगिता नव्या ऊर्जेने मांडली. योग आणि अध्यात्मावर आधारित आधुनिक विज्ञानातील तत्वे त्यांनी जागतिक समुदायासमोर मांडली.राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह अनेक मान्यवर स्वामी कुवलयानंद यांच्या संपर्कात होते. स्वामीजींच्या मार्गदर्शनाचा देशातील महान व्यक्तिमत्त्व आणि सामान्य लोकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम झाला. स्वामीजींची योग शिकवण त्यांच्या शिष्य परंपरेने पुढे नेली जात आहे, असेही राष्ट्रपती म्हणाल्या.

रायरंगपूर, ओडिशा येथील 'श्री अरबिंदो इंटेग्रल एज्युकेशन सेंटर' मध्ये शिकविण्याची आणि आज कैवल्यधामच्या शताब्दी सोहळ्याच्या उद्घाटनात सहभागी होण्याची संधी मिळाली हे आनंददायी असल्याचे राष्ट्रपती म्हणाल्या.

स्वामी कुवलयानंद शाळांमध्ये योगशिक्षणाच्या प्रसाराला खूप महत्त्व देत असत. कैवल्यधाम संस्थान संचालित कैवल्य विद्या निकेतन नावाची शाळा इतर शाळांसमोर याबाबतचे उदाहरण ठेवण्यास प्रेरणा देईल, असेही त्या म्हणाल्या.श्री. प्रभू म्हणाले की, लोणावळा या पुण्यभूमीत देशाच्या स्वातंत्र्यानंतर प्रथमच देशाचे राष्ट्रपती आले आहेत. योग ही एक विद्या आहे. त्यामुळे त्याचा अभ्यास व्हावा. ते शास्त्र आणि कला असल्यामुळे त्याचे आकलन, तसेच संस्कृतीचा एक हिस्सा असल्यामुळे त्याचे जतन व्हावे. आस्था असल्यामुळे स्मरण व्हावे, अध्यात्म असल्यामुळे चिंतन व्हावे आणि स्वीकार व्हावा म्हणून विश्र्लेषणही झाले पाहिजे. या सर्व बाबी कैवल्यधम येथे एकच ठिकाणी मिळतात, कैवल्यधाम हे येणारी हजारो वर्षे विश्र्वाला ऊर्जा देणारे स्थान ठरेल, असेही श्री. प्रभू म्हणाले.

यावेळी संस्थेचे सचिव श्री. तिवारी यांनी स्वागत केले. याप्रसंगी कैवल्यधाम संस्थेच्या स्थापनेपासूनच्या प्रवासाचा माहितीपट दाखविण्यात आला. तसेच कैवल्यधाम प्रकाशनाच्या पुस्तकांचे प्रकाशन राष्ट्रपती महोदयांच्या हस्ते करण्यात आले. तत्पूर्वी राष्ट्रपती महोदयांनी कैवल्यधामचा इतिहास चित्ररूपाने मांडणाऱ्या गॅलरीला भेट देऊन पाहणी केली.

# 'धर्मवीर-२' चित्रपटाच्या मुहुर्ताचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

## धर्मवीर स्व.आनंद दिघे साहेबांच्या संस्कारानुसार जनतेचे भले करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत राहणार : मुख्यमंत्री शिंदे

ठाणे : सर्वधर्मसमभाव हा भाव मनात ठेवून समाजातील प्रत्येक गरजूला न्याय मिळवून देणे, हीच धर्मवीर स्व.आनंद दिघे साहेबांची कार्यपद्धती होती, त्यांचेच आम्हीही अनुकरण करीत आहोत. त्यांनी दिलेल्या संस्कारानुसार आपल्या हातून जनतेचे भले होण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत राहणार, असे प्रतिपादन मुख्यमंत्री




एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले. 'धर्मवीर-२' या चित्रपटाच्या मुहूर्त शुभारंभप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री दादाजी भुसे, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रविंद्र फाटक, निर्माता मंगेश देसाई, दिग्दर्शक प्रवीण तरडे, मुख्य कलाकार प्रसाद ओक, मंगेश कुलकर्णी, चित्रपटाची निर्मिती टीम व कलाकार उपस्थित होते.'धर्मवीर' चित्रपटाच्या पहिल्या भागाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. धर्मवीर स्व.आनंद दिघे यांनी समाजातल्या सर्व स्तरातील घटकांचे कल्याण केले, ते सर्वांसाठी जगले, गोरगरिबांसाठी स्वतःचे आयुष्य झोकून दिले. त्यांच्याच संस्कारावर व शिकवणीवर आपले शासन काम करीत आहे. गेल्या वर्षभरात शासनाने घेतलेले निर्णय लोकाभिमुख आहे. गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त जिल्ह्यात अद्ययावत कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यात आले असून या माध्यमातून अनेक गरजूंना काम मिळणार आहे. समृद्धी महामार्ग अपघातमुक्त करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. जास्तीत जास्त गरजू लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा थेट लाभ मिळण्याच्या उद्देशाने शासन आपल्या दारी हा उपक्रम राज्यात यशस्वीपणे राबविला. आजपर्यंत या उपक्रमाच्या माध्यमातून १ कोटी ८० लाख लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. कोणतीही भूमिका साकारताना सर्वस्व अर्पण केल्यावरच यश मिळते, त्याप्रमाणे हे शासन सदैव गोरगरीब जनतेच्या कल्याणाचा विचार करीत काम करीत आहे, असे सांगून मुख्यमंत्र्यांनी उपस्थित सर्वांचे धन्यवाद मानले. सर्वांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आणि धर्मवीर स्व.दिघे साहेबांचे लोकसेवेचे कार्य या चित्रपटाच्या माध्यमातून सर्वांनी आवर्जून पाहावे, असे आवाहनही केले.

# आमदार भरतशेठ गोगावले यांना कोळी जमातीच्या लोकांनी घातला घेरावा

पंढरपूर/प्रतिनिधीः आदिवासी क्षेत्राच्या बाहेर राहणाऱ्या महादेव, मल्हार, टोकरे ,ढोर कोळी जमातीच्या लोकांना अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र सुलभ पद्धतीने मिळत नाही. ते मिळावे या मागणीसाठी शिवसेनेचे शिंदे गटाचे आमदार भरतशेठ गोगावले यांना पंढरपूर येथे कोळी जमातीच्या लोकांनी घेराव घातला आहे व घोषणा दिल्या.अशी माहिती महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी दिली

यावेळी रेस्टहाऊस येथे कोळी जमातीच्या शिष्टमंडळाला चर्चेसाठी त्यांनी बोलावले. त्यावेळी कोळी जमातीचे अभ्यासक प्रा. बाळासाहेब बळवंतराव यांनी आमदार भरतशेठ गोगावले यांना अनुसूचित जमातीच्या सवलतीस पात्र ४५ जमातीची २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात १ कोटी पाच लाख लोकसंख्या, ही लोकसंख्या गृहीत धरून ९.३५% केंद्र व राज्य सरकार ट्रायबल डेव्हलपमेंट फंडची तरतूद केली जाते.या लोकसंख्येनुसार ९.३५% प्रमाणे २५ आमदार व ४ खासदार निश्र्चित करून अनुसूचित जमातीच्या लोकांना राजकीय प्रतिनिधित्व दिले आहे. हे आमदार सातत्याने आदिवासी क्षेत्रातूनच निवडून जातात. ते विशिष्ट जमातीचे असल्यामुळे आपल्या जमातीपुरताच संकुचित विचार करतात. त्यामुळे सातत्याने अनुसूचित क्षेत्राच्या बाहेर राहणाऱ्या सवलतीस पात्र ४५ पैकी ३३ जमातीच्या लोकांना यादीमध्ये असूनही सवलती पासून वंचित ठेवतात असा आरोप केला. आमदार खासदार निश्र्चित करताना तसेच ९.३५% प्रमाणे फंडाची तरतूद करताना लोकसंख्या खरी असते आणि सवलती देताना मात्र ते खोटे आदिवासी कसे असतात असा प्रश्र्न उपस्थित केला

१९०१ ते १९४१ या कालखंडात महाराष्ट्रात कोळी जमातीची पोट जातीचा उल्लेख करून जनगणना झाली नाही. महाराष्ट्रात सर्वांच्याच नोंदी कोळी या मातृ जमातीखाली झाल्या असल्याने १९५० पूर्वीची महादेव कोळी ची नोंद सापडत नाही. कोळी नोंदीवरून आदिवासी क्षेत्रातील कोळी जमातींना जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र सुलभ पद्धतीने दिले जात आहे. तोच निकष आदिवासी क्षेत्राच्या बाहेरील कोळी जमातीला लावून त्यांनाही जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र सुलभ पद्धतीने देण्यात यावे. अशी मागणी केली.

जिल्ह्यातील महादेव कोळी जमातीचे पुरावे असून सुद्धा प्रांताधिकारी गजानन गुरव जात प्रमाणपत्र सुलभ पद्धतीने देत नाहीत. त्यामुळे समाजावरती प्रचंड अन्याय होत आहे. तसेच सर्व पुरावे महादेव कोळी असताना सुद्धा एसबीसीची खोटी जात प्रमाणपत्रे घेण्यासाठी भाग पाडत आहेत. एखाद्या जमातीचा प्रवर्ग बदलण्याचा अधिकार प्रांताधिकार्यांना कोणी दिला. असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यावर भरतशेठ गोगावले यांनी प्रांताधिकारी गुरव यांना योग्य पद्धतीने काम करण्याच्या सूचना दिल्या असून आगामी नागपूर हिवाळी अधिवेशनात कोळी जमातीचा प्रश्र्न सभागृहात उपस्थित करणार असल्याचे व कोळी .जमातीच्या शिष्टमंडळाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घालून सविस्तर चर्चेसाठी बोलवणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# नागणसुर कन्नड मुली शाळेचे केंद्रस्तरीय टलेट हंट स्पर्धेत उज्वल यश

**कथाकथन स्पर्धेत अंबिका मायनाळे प्रथम,वक्तृत्व स्पर्धेत सौंदर्या मांग द्वितीय, चित्रकला स्पर्धेत शिलवंती कोळी द्वितीय क्रमांक पटकावून तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवड**


अंबिका मायनाळे


सौंदर्या मांग


शिलवंती कोळी

अक्कलकोट/प्रतिनिधीः जिल्हा परिषद सोलापूर व पंचायत समिती शिक्षण विभाग अक्कलकोट यांच्या वतीने घेण्यात आलेल्या विद्यार्थी टॅलेंट हंट स्पर्धेत नागणसुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुली शाळेचे विद्यार्थीनी घवघवीत यश संपादन करून तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाले आहे.

दर वर्षी प्रमाणे जिल्हा परिषद शिक्षण विभाग सोलापूर आणि पंचायत समिती शिक्षण विभाग अक्कलकोट यांच्या वतीने ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देऊन व्यासपीठ निर्माण करून देण्यासाठी विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास अंतर्गत कथाकथन, वक्तृत्व,चित्रकला, निबंध ,समूहगीत गायन,लोकनृत्य आदी स्पर्धा घेतली जाते.शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी केंद्रस्तरिय स्पर्धा नागणसुर येथील शेळके प्रशालेत घेण्यात आले.मोठागट कथाकथन स्पर्धेत अंबिका मायानाळे प्रथम क्रमांक पटकाविला आहे.वक्तृत्व स्पर्धेत सौंदर्या मांग हिने द्वितीय क्रमांक पटकाविला आहे.तसेच चित्रकला स्पर्धेत शिलवंती कोळी हिने द्वितीय क्रमांक पटकावून तीनही विद्यार्थिनी तालुकास्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे तसेच मोठागट व लहान गट लोकनृत्य आणि समूहगीत गायन स्पर्धेत शाळेचे दोन्ही गटाने अनुक्रमे दोन्ही स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावून यशाची परंपरा कायम राखली आहे .

यशस्वी विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभाग प्रमुख मुख्याध्यापक मल्लप्पा कवठे ,विषय शिक्षक शरणप्पा फुलारी,राजशेखर खानापुरे,कल्लय्या गणाचारी,शांता तोळनुरे,लक्ष्मीबाई देगांव, लक्ष्मीकांत तळवार राजशेखर कूर्ले आदी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले आहे.यशस्वी विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे,विस्तार अधिकारी भीमाशंकर वाले,केंद्रप्रमुख गुरुनाथ नरूणे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सदानंद मठपती,उपाध्यक्ष गजानंद रेवी,सर्व सदस्य,ग्रामपंचायतीचे सरपंच सुनीता चव्हाण,उपसरपंच धनराज धनशेट्टी,सर्व सदस्य पालक ग्रामस्थ अभिनंदन करून पुढील तालुकास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहे.

# झाडे लावणे आणि आपला परिसर स्वच्छ ठेवणे काळाची गरज : सुरेश पवार गुरुजी



पंढरपूर/प्रतिनिधीः करकंब पंढरपूर तालुक्यातील करकंब येथे गावच्या लेकीच झाड अभियान टीम व जागर स्वच्छता अभियान टीमच्या दुसरा वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आला होता त्यावेळी तुकाराम महाराजांची वंशजवक्षप्रेमी शिवाजी महाराज मोरे आणि व्याख्याते सुरेश पवार बोलताना सांगितले

सुरुवातीला शिवाजी महाराज मोरे सुरेश पवार शैलेश गायकवाड ज्ञानेश्र्वर दुधाने हरिश्र्चंद्र वाजते प्रमोद रेडे रमेश खारे संतोष भोसले नंदलाल कपडे कर अंजली टिकले औदुंबर कुंभार सविता दुधाने प्रमोद रेडी राजू अनवते नागेश खारे चेतन पूर्वत यांच्या शुभहस्ते चौंडेश्र्वरी मातेची पूजा व दीप प्रज्वलन करून झाली

यावेळी वृषाली भोंदे यांनी जागरण लेकीच झाड टीम अशा पद्धतीने काम करतोय याची माहिती सांगितली त्यानंतर लेकीचं झाडाचे मूळ संकल्प सुरेश पवार यांनी बोलताना लेखित झाडाची कल्पना अशी सुचली आणि काम करीत असताना किती अडचणी तोंड द्यावे लागले आणि अशा उपक्रमांना साथ कमी मिळते पण आध्यात्मिक आनंद जास्त मिळतो त्यामुळे कामात सातत्य ठेवा यश निश्र्चित मिळेल

यानंतर तुकाराम महाराज यांचे वृक्षप्रेमी आदरणीय शिवाजी महाराज मोरे यांनी हरित वारी करण्यासाठी अधिक परिश्रम कशाप्रकारे घेत आहोत आणि भंडारा डोंगर भालचंद्र डोंगर हरित करण्यासाठीच प्रयत्न वृक्षाला ही संस्थेच्या माध्यमातून कशाप्रकारे करतो आणि वृक्ष लागवड करणे पुण्याचे तर काम आहेच अशी पुढील तरुण पिढी वाचवायचे असेल तर वृक्षारोपण ही काळाची गरज आहे असे सांगितले सर्वांनी आपली अखंड ठेवा यानंतर करकंब मधील आपल्या घरांचा परिसर स्वच्छ ठेवणार कुटुंबाचा स्वच्छ कुटुंब सुंदर कुटुंब पुरस्कार प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते देण्यात आला त्यामध्ये खरखंब पोलीस स्टेशनचे सुदर्शन दुधाने वैभव पंथ याकूब तांबोळी मनोज पुरवत हरी ढोबळे अशोक म्हेत्रे राजेश खंदारे अंकुश जाधव नागनाथ कुंभार भगवान भंडारे मुमताज शेख श्रीकांत आरोळी गणपत शिंदे ज्ञानेश्र्वर राजगुरू यांना सन्मानपत्र व मानाचा फेटा बांधून पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आली

यानंतर अमृता सरगुले हिचा राज्यस्तरीय योग स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवल्याबद्दल करकंब क्रिकेट क्लब आयोजित महाराष्ट्र भर गावचं नाव रोशन केल्यामुळे प्रतिनिधी संजय मोहिते यांचाही सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक नंदलाल कपडे कर यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लेखीचे झाड संकल्प ज्ञानेश्र्वर दुधाने यांची केले पाहुण्यांची ओळख संतोष भोसले अंजली टकले यांनी केली तर आभार प्रा प्रमोद रेडे पाटील यांनी मांडले

यावेळी करकंबा ग्रामस्थांनी उपस्थित राहून निश्र्चित भविष्यकाळात आम्हीही सहभागी होऊन पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सहकार्य करू असे सांगून सुंदर कार्यक्रम संपन्न झाला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जागर स्वच्छता अभियान टीम करकंब गावच्या लेकीच झाड अभियान टीम एकलव्य अभ्यासिका व सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले

# तपकिरी शेटफळ येथे कायदेविषयक शिबीर संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधी : किमान समान शिबीराअंतर्गत मंगळवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०२३ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तपकिरी शेटफळ येथे जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे, , पंढरपूर यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यायाधीश एस. ए. साळुंखे, यांच्या अध्यक्षतेखाली कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीरास शालेय मुला-मुलींना कायदेविषयक जनजागृती करण्यात येवुन त्यांना त्यांच्या हक्का विषयी माहिती देण्यात आली. सदर शिबीरामध्ये पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष श्री. अर्जुन पाटील, उपाध्यक्ष श्री. शिशिकांत घाडगे, विधीस्वयंसेवक श्री. नंदकुमार देशपांडे, श्री. सुनिल यारगट्टीकर, श्री. महेश भोसले, ॲड.श्री.अंकुश वाघमारे, प्रशालेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.




# पंढरपूर न्यायालयामध्ये संविधान दिन साजरा

पंढरपूर/प्रतिनिधीः जिल्हा न्यायालय, पंढरपूर येथे श्री. एम. बी. लंबे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली व अधिवक्ता संघ यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमास संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचे प्रतिमापुजन करुन कार्यक्रमास सुरुवात केली. पुणे येथील विधीज्ञ पांडुरंग थोरवे, माजी अध्यक्ष पुणे बार असोसिएशन यांनी मोजणी व मोजणी निगडीत असणाऱ्या कायद्यातील तरतुदी या विषयावर सर्वांना मार्गदर्शन केले. सदर प्रसंगी अधिवक्ता संघाचे अध्यक्ष श्री. अर्जुन पाटील, न्यायाधीश श्रीमती एस. एस. पाखले, श्री. ए. ए. खंडाळे, श्री. एन. एस. बुद्रुक, श्री. पी. पी. बागुल, श्री. एस. ए. सोनवलकर, श्री. एस. ए. साळुंखे, उपाध्यक्ष श्री. शशिकांत घाडगे तसेच विधीज्ञ व पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अजनसोड गावाच्या तंटामुक्त अध्यक्षपदी शशिकांत पाटील यांची निवड



पंढरपूर/प्रतिनिधी:पंढरपूर तालुक्यातील अजनसोंड येथे सरपंच व ग्रामसेवक सचिव यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक २८ नोव्हेंबर रोजी ग्रामसभा भरविण्यात आली

यावेळी अजनसोंड गावच्या सरपंच वर्षाताई समाधान डबल ग्रामसेवक मॅडम पोलीस पाटील मेघा समाधान घाडगे अंगणवाडी सेविका टेबल मॅडम गावची तलाठी भाऊसाहेब गोरे माझी डेपोटी सरपंच तानाजी शिरगिरे संजय सोनटक्के माजी सरपंच एकनाथ डुबल ग्रामपंचायत सदस्य राजाभाऊ घाडगे

नागनाथ शिरगिरे परमेश्र्वर डबल दादा डबल निलेश घाडगे हरिभाऊ घाडगे कुमार काळे बाळा पाटील शिवाजी पाटील भाऊ शिरगिरे यासह ग्रामस्थ उपस्थित होते

# खरीप पिकांचे सरसकट विमा रक्कम शेतकऱ्यांना त्वरित जमा करण्याची रासपची मागणी



अक्कलकोट/प्रतिनिधीः प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत चालू हंगामातील खरीप पिकांचे पिक विमा सर्व शेतकरी भरले असून सरकारने दिवाळीला २५% रक्कम सरसकट शेतकऱ्यांना मदत म्हणून देण्याची घोषणा केली होती. परंतु प्रत्यक्षात ६०% लोकांना पिक विम्याचे रक्कम मिळाले असून राहिलेल्या ४०% शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे. तरी उर्वरित राहिलेल्या सर्व शेतकरी बांधवांना त्यांच्या बँक खात्यात पिक विम्याचे रक्कम त्वरित जमा करावे याबाबतचे निवेदन राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने अक्कलकोटचे तहसीलदार बाळासाहेब शिरसट व तालुका कृषी अधिकारी डी. एच. निगडे यांना देण्यात आले. यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे माजी तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर, युवक आघाडीचे तालुका अध्यक्ष दाजी कोळेकर, सलगर जिल्हा परिषद गट प्रमुख रेवणसिध्द शेरी, शिवा सवळी, विठ्ठल कत्ते, विठोबा कोळेकर आदी उपस्थित होते.

तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, खरीप पिकांपैकि फक्त सोयाबीन पिकाचे पिक विमा रक्कम जमा केली जात आहे परंतु सरसकट शेतकरी बांधवांना सदरची रक्कम मिळाली नसल्याने शेतकरी बांधवांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे. शेतकरी त्यांचे आधार कार्ड अपडेट तसेच आधार फिडींग, बँक खाते केवायसी व पोस्ट बँकेतील खाते काढूनही त्यांच्या खात्यात रक्कम जमा होत नाही. तरी येत्या आठ दिवसांत शेतकऱ्यांना पिक विम्याचे रक्कम जमा न केल्यास तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर शेतकरी बांधवांना घेऊन आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने माजी तालुकाध्यक्ष दत्तात्रय माडकर यांनी दिला आहे.

# कार्तिक वारीत भाविकांना लुटणाऱ्या रिक्षा चालकासह दोघा चोरट्यांना अटक

पंढरपूर/प्रतिनिधी:जबरी चोरीतील गुन्हामधील आरोपींना अटक करून गुन्हातील रोख रक्कम हस्तगत करण्यात आले आहे. पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत मौजे वाखरी तालुका पंढरपूर कार्तिक वारी निमित्त जनावरांचा बाजार पाहण्यासाठी यातील फिर्यादी शंकर सिताराम भालसिंग रा वाळकी तालुका व जिल्हा अहमदनगर हे व त्यांच्या नेते नातेवाईकाबरोबर अकलूज येथून २२ नोव्हेंबर रोजी रात्री १०/३० वाजता वाखरी तालुका पंढरपूर येथे आले होते त्यानंतर पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी रिक्षा भाड्याने करून जात असताना आतील आरोपी रिक्षाचालक व त्यांची साथीदार फिर्यादी व साक्षीदार यांना लाता बुक्क्याने मारहाण करून त्यांच्या जवळची रोख रक्कम रुपये ५८ हजार पाचशे जबरदस्तीने काढून घेतल्यामुळे पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणे गु.र.न.५३८/२०२३भा.ल. वि.कलम,३९२ प्रमाणे २३ नोव्हेंबर रोजी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला होता सदर होण्याचे गांभीरे ओळखून गुन्हातील अज्ञात आरोपी शोध कमी पंढरपूर ग्रामीण व शहर पोलीस ठाण्यातील




पोलीस पथक नेमून सदर गुन्ह्यातील आरोपीतील तीन आरोपी गुन्हातील वापरलेली रिक्षा निष्पन्न करून सदर गुन्ह्यातील आरोपींकडून रोख रक्कम हा सगळा करून करण्यात आली

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक सरदेशपांडे सोलापूर ग्रामीण, अप्पर अधीक्षक हिम्मत जाधव व सोलापूर ग्रामीण उपविभागीय अधिकारी डॉ. अर्जुन भोसले पंढरपूर विभाग पंढरपूर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिरीष हुंबे पोलीस दिवसे साहेब फौजदार आप्पासाहेब कच्चे पोलीस हेडकॉन्स्टेबल राहुल शिंदे पोलीस नाईक गणेश इंगोले शहर पोलीस ठाण्यातील साहेब फौजदार राजेंद्र गोसावी साहेब शरद कदम प्रसाद आवटी यांनी केले असून सदर गुन्ह्याच्या तपास पोलीस निरीक्षक शिरीष हुंबे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे

# बेवारस बालकांसाठी संपर्क साधण्याचे आवाहन

***३० दिवसाच्या आत मुलांचे निरीक्षणगृह / बालगृह, उत्तर सदर बाजार किंवा आई बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, वसंत विहार किंवा जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अतुल वाघमारे( ७२१९१०४५०३) यांच्याशी संपर्क साधावा**

सोलापूर/प्रतिनिधीः साई व अर्जुन ही बालके जि. वारंगल, राज्य तेलंगणा येथे बेवारस सापडले आहे. बाल कल्याण समिती सोलापूर यांचे आदेशाने दि. २२ एप्रिल २०१९ रोजी, मंगेश हे बालक लोहमार्ग पोलीस स्टेशन, सोलापूर मार्फत बाल कल्याण समितीच्या आदेशाने ०४ मार्च २०२० रोजी, शांतम्मा व विठ्ठलगौडा ही बालके जोडभावी पोलीस स्टेशन,सोलापूर मार्फत बाल कल्याण समितीच्या आदेशाने २३ जून २०१९ रोजी मुलांचे निरीक्षणगृह/बालगृह सोलापूर या संस्थेत दाखल करण्यात आली आहेत. तसेच नरेंद्र परमेश्र्वर मोची हे बालक बाल कल्याण समितीच्या आदेशाने १३ जून २०२२ रोजी आई बहुउद्देशीय बालगृह, सोलापूर या संस्थेत दाखल करण्यात आले असल्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सोलापूर यांनी पत्रकान्वये कळविले आहे. तरी बाळाच्या पालकांना व नातेवाईकांना आवाहन करण्यात येते की, ही माहिती प्रसिद्ध झालेपासुन ३० दिवसाच्या आत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अतुल वाघमारे संपर्क क्र. - ७२१९१०४५०३ किंवा बाल कल्याण समिती, जिल्हा परिवीक्षा अनुरक्षण संघटना संचलित निरीक्षणगृह/बालगृह, ९३७/९,नार्थ सदर बझार,सोलापूर व आई बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, वसंत विहार, सोलापूर यांचेशी संपर्क साधावा, असे प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आलेले आहे.

# देशाच्या प्रगतीत विकास पत्रकारितेचे योगदान मोठे : डॉ.काकडे

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर भारतीय पत्रकारितेचा इतिहास हा खूप मोठा असून येथील उत्तरपत्र व पत्रकारांची भूमिका ही नेहमीच देशाच्या विकासासाठी राहिली आहे समाज व देशाच्या प्रगतीसाठी विकास पत्रकारितेची अतिशय गरज असून आज पर्यंत विकास पत्रकारितेने मोठे योगदान दिले जे गौरव उद्गार विजापूर येथील कर्नाटक स्टेट युनिव्हर्सिटीचे माझे कुलगुरू प्रा डॉ. ओंकार काकडे यांनी काढले मंगळवारी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सामाजिक शास्त्रीय संकुल येथील मास कम्युनिकेशन विभाग सोलापूर विज्ञान केंद्र आणि सुसंवाद माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञान पर्यावरण आणि विकास पत्रिका रे तेथील नवे प्रवाह या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटन डॉ. काकडे यांच्या हस्ते झाले यावेळी ते बोलत होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पुरातत्त्वशास्त्र विभागाच्या प्रमुख माया पाटील या होत्या

यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ पत्रकार यमाजी मालकर शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील मास कम्युनिकेशन विभागाच्या प्रमुख निशा पवार मुंबई च्या एसएनडीटी विद्यापीठातील डेव्हलपमेंट कम्युनिकेशन विभागाच्या प्रमुख डॉ. मीरा देसाई मध्य प्रदेशातील मखलाल चतुर्वेदी विद्यापीठाचे डॉ. संदीप भट सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वृत्तविद्या विभागातील प्रा योगेश बोराटे जळगाव येथील ज्येष्ठ पत्रकार पंकज पाटील विज्ञान केंद्राचे संचालक राहुल दास सुसंवाद संघटनेचे सचिव सचिन गायकवाड यांची उपस्थिती होती

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मास्क कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख रवींद्र चिंचोलकर यांनी केले यावेळी मान्यवराच्या हस्ते मास कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर यांच्या सोशल मीडिया फॉर पार्टी सेपेंटरी डेव्हलपमेंट या ग्रंथाचे प्रकाशन झाले

पुढे बोलताना डॉ. काकडे यांनी विज्ञान व तंत्रज्ञान यामुळे मोठे संशोधन होऊन विकास होत असल्याचे स्पष्ट केले विकास पत्रकारितेसाठी बाबी फार महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद



केले डॉ. माया पाटील यांनी डॉ. चिंचोलकर यांनी मास कम्युनिकेशन विभागाच्या मोठा विकास केला व पर्यावरणाने विद्यापीठाचाही विकास झाले जी त्यांनी यावेळी सांगितले यावेळी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले

माध्यमाशी विकासात भूमिका या विषयावरील चर्चासत्रात ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी लोकमतचे कार्यकारी संपादक सचिन जवळकोटे तरुण भारतचे संपादक विजयकुमार पिसे सकाळचे वरिष्ठ पत्रकार रजनी जोशी दिव्य मराठी वरिष्ठ पत्रकार सिद्धाराम पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले सर्व जिल्ह्याच्या भूमिका बजावल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी कांबळे यांनी केले तर आभार अंबादास भास्के यांनी मांडले

# महार वतन परिषदेचा ९६ वर्षपूर्ती ऐतिहासिक सोहळा

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार येथे मोठ्या उत्साहात संपन्न



सोलापूर/प्रतिनिधीः १९२७ रोजी थोरला महारवाडा सोलापूर येथे सोलापूर जिल्हा महार वतनदार परिषदेचे दुसरे अधिवेशन डॉ.भीमराव रामजी आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले होते. त्याच अधिवेशनाचा ९६ वा वर्षपूर्ती सोहळा विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार मिलिंद नगर बुधवार पेठ येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व प्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थि ला वंदन करून बुद्ध,शिव,फुले,शाहू,आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी तहसीलदार बी.के.तळभंडारे यांची नेमणूक करण्यात आली.

प्रसंगी प्रमुख व्याख्याते व प्रमुख उपस्थित मान्यवरांचा सत्कार समस्त महार वतनदार ट्रस्ट व थोरला राजवाडा मिलिंद नगर बुधवार पेठ यांच्या वतीने मानाचा निळा फेटा व पंचशील उपरण घालून करण्यात आला.

यावेळी युवा वक्ते आनंद मसलखांब व सामाजिक कार्यकर्ते नागेश रणखांबे यांनी देखील आठवणींना उजाळा देत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या महत्वाच्या बाबी आपल्या मनोगतातून नमूद केल्या. तसेच आंबेडकर चळवळीतील जेष्ठ नेते व ट्रस्टचे प्रमुख मा.सुभानजी बनसोडे यांनी सोलापुर हे फक्त चळवळीचे नसुन वैचारिक क्रांतीचे शहर आहे असे उद्गार काढत उपस्थितांना बाबासाहेबांना सोलापुरातील अनुयायांकडुन काय अपेक्षित होते आणि आता आंबेडकरी चळवळीस काय अपेक्षित आहे ह्याचा उलगडा करित वतनदार परिषदेच्या कार्यक्रमाचा उद्देश उपस्थितांना पटवून देत डॉ.आंबेडकर यांना अभिप्रेत असणारा समाज आपण कसा घडवू शकतो याबद्दल मार्गदर्शन केले.

तद्नंतर आंबेडकर चळवळीतील जेष्ठ नेते आणि ट्रस्टचे प्रमुख मा.राजाभाऊ सरवदे यांनी ९६ वर्षांपूर्वी झालेल्या महार वतन परिषदेतील संवाद आणि परिषदेतील आठवणींना उजाळा देत,मिलिंद नगर येथे असलेल्या ऐतिहासिक पंचाच्या चावडीचा इतिहास सांगून त्याचे महत्त्व सांगितले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक,राजकीय,आर्थिक,शैक्षणिक चळवळीची मुहूर्तमेढ कश्यापद्धतीने आणि का सोलापुरातूनच केली याचे स्पष्टीकरण दिले तसेच ट्रस्ट ही युवा पिढी सोबत कायम असेल असे अश्र्वस्त केले.

व्याख्यानमालेचे प्रमुख व्याख्याते ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ.सारिपुत्र तुपेरे यांनी सोलापुरात पार पडलेल्या महार वतन परिषदेच्या अधिवेशनाची माहिती तसेच अधिवेशनात संपन्न झालेल्यां संवादाचे दाखले देत त्या अधिवेशनाचे महत्त्व पटवून सांगितले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सोलापुरात केलेल्या कार्याची माहिती सांगत डॉ.बाबासाहेब आंबेडकर व सोलापूर यांचे ऋणानुबंध सांगितले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात भाकरी पेक्षा स्वाभिमानाला महत्व द्या,युवकांनी फुले शाहू आंबेडकर चळवळीत काम करताना कशाप्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर समजून घेतले पाहिजे व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा घेऊन चळवळीत युवकांनी सक्रिय झाले पाहिजे असे सांगितले.तसेच आठवणींना उजाळा देत २६ व २७ नोव्हेंबर १९२७ रोजी पार पडलेल्या अधिवेशनाचा सोहळा करण्याचे आपल्याला भाग्य मिळाले असल्याचे मान्यवरांकडून सांगण्यात आले.

मिलिंद नगरचे आंबेडकर चळवळीतील असलेल्या योगदानाचे महत्व सांगत मिलिंद नगर हे चळवळीतील क्रांतीचे ठिकाण असल्याचे सांगितले,तसेच समस्त महार वतनदार ट्रस्ट मधील युवक पिढीचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.सदर व्याख्यानमालेस ज्येष्ठ वतनदार उत्तम आबुटे,बापू तळमोहिते,विकास सरवदे,अनिल धिमधीमे, शशिकांत तळमोहिते,संजय बाबरे यांची देखील उपस्थिती लाभली.

कार्यक्रम पार पाडण्यासाठी शिवम सोनकांबळे,प्रवीण तळभंडारे, श्रीनिवास सरवदे,समाधान आबुटे, मयूर तळभंडारे,अतुल सोनकांबळे,अनिकेत आबुटे, अजित सरवदे,विकी तळभंडारे,पंकज बाबरे, आदेश तळभंडारे,रोहित तळमोहिते, सांत बनसोडे आदींनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशील सरवदे यांनी केले.तर आभार कार्यक्रमाचे अध्यक्ष बी.के.तळभंडारे यांनी मानले.या कार्यक्रमास सोलापूर शहरातील नागरिक,महिला व युवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महु येथील जन्मभुमी स्मारकाला लष्कराची साडे सात एकर जमीन मिळवुन देण्यासाठी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेणार : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

## भिमजन्मभुमी स्मारक महु येथे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिली सहकुटूंब भेट

मुंबई : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महु (मध्यप्रदेश) येथील जन्मभूमी स्मारकाला आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी सहकुटूंब भेट दिली. भिमजन्मभूमी स्मारकात महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकरांच्या महु येथील जन्मभूमी स्मारकाला साडे सात एकर जमीन मिळाली पाहिजे अशी येथील जनतेची मागणी असून या मागणीच्या पूर्ततेसाठी संरक्षण मंत्री ना.राजनाथ सिंह यांची आपण भेट घेणार आहोत असे ना.रामदास आठवले यांनी आश्र्वासन दिले.



भिमजन्मभूमी स्मारकाला दरवर्षी लाखोंची गर्दी येथे वाढत आहे. महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकरांचे जन्मस्थळ म्हणून येथील स्मारकाला देशभरातुन देश-विदेशातुन लाखो लोक अभिवादन करण्यासाठी येत असतात. त्यामुळे या स्मारकाला जागा अपुरी पडत आहे. या स्मारकासाठी अधीक जागेची आवश्यकता असल्यामुळे महु जन्मभूमी लगत असलेल्या जागेपैकी साडेसात एकर जमीन भिम जन्म भूमी स्मारकाला आपण मिळवुन देणार आहोत. त्यासाठी भारत सरकारचे संरक्षणमंत्री मा.ना. श्री. राजनाथ सिंह यांची आपण भेट घेणार असल्याची माहिती रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी दिली.

भिमजन्म भूमी स्मारक महु येथे येणा-या अनुयायांना भिमजन्म भुमी स्मारक समिती तर्फे मोफत चहा,पाणी, भोजन, अल्पोहार देण्यात येतो. त्या सेवेला मदत म्हणून आज केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी वैयक्तिक ५० हजार रुपयांची मदत दिली. भीम जन्मभूमी स्मारकाला वार्षिक खर्च म्हणून मध्य प्रदेश राज्य सरकार ने आपल्या अर्थसंकल्पात २ कोटींची तरतूद करावी अशी मागणी ना.रामदास आठवले यांनी केली आहे.यावेळी ना. रामदास आठवले यांच्या समवेत त्यांच्या पत्नी सौ. सिमाताई आठवले पुत्र जित आठवले आणि आदि कुटुंब त्यांच्या समवेत होते.

भिमजन्म भूमी स्मारक येथे दरवर्षी गर्दी वाढत आहे. त्यामुळे या भागामध्ये या स्मारकाचा विस्तार करणे आवश्यक आहे. त्यामुळे साडेसात एकर जमीन ही मिळवुन या ठिकाणी डॉं. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे उभारण्याची गरज आहे. भिमजन्म भुमी स्मारक भव्य दिव्य करण्यासाठी साडेसात एकर जमीन या स्मारकाला आपण मिळवुन देणार आहोत. या जागेमध्ये संविधान भवन उभारले जावे; तसेच

विपश्यना सेंटर, सामाजिक सभागृह, आदिंचा या स्मारक विस्तारांमध्ये समावेश असेल. आणि त्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे ना. रामदास आठवले यांनी सांगितले. हा भाग लष्काराच्या भागाची सर्व जमीन महु येथे लष्करी छावणी होती. आणि या भागातील जमीन ही लष्कराच्या मालकी हक्काची असल्यामुळे भारताचे संरक्षणमंत्री ना. राजनाथ सिंह यांची भेट घेवुन आपण यातील साडेसात एकर जमीन भिमजन्म भुमी स्मारकाला आपण मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. अशी माहिती ना. रामदास आठवले यांनी दिली.

# आरक्षण अंमलबजावणी संदर्भात घोंगडी बैठक

कळंब/प्रतिनिधीः दि.२४ नोव्हेंबर २०२३ रोजी सायंकाळी ६ वा. शासकीय विश्रामगृह येथे ३० नोव्हेंबरला धाराशिव येथे होणाऱ्या धनगर एस.टी आरक्षण अंमलबजावणी मोर्चा संदर्भात सकल धनगर समाज कळंब च्या वतीने घोंगडी बैठक करण्यात आली होती. यावेळी धनगर एसटी आरक्षण न्यायालयीन विषयी महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंच मुंबई चे संचालक मराठवाडा विभाग डॉ. रामकृष्ण लोंढे यांनी सविस्तर माहिती दिली. न्यायालयीन लढाई अंतिम टप्प्यात आली असून येत्या ८,११,व १५ डिसेंबरला मुंबई उच्च न्यायालयात तीन दिवस अंतिम सुनावणी होऊन केस चा निकाल लवकरच धनगरांच्या बाबतीत सकारात्मक लागू शकतो असे त्यांनी संबंधितांना सांगितले.



धनगर एस.टी आरक्षण अम्मल बजावणी चा मुद्दा गेले ७५ वर्षे प्रलंबित असून सरकारचे लक्ष वेधण्यासाठी रस्त्यावरील लढाई जोर धरू लागली आहे. याचाच एक भाग म्हणून ३० नोव्हेंबरला धाराशिव येथे जिल्हाधिकारी कचेरीवर धनगरांचा धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. संपूर्ण जिल्ह्यातून जवळपास एक लाख धनगर बांधव या विशाल महामोर्चात सहभागी होतील असा अंदाज संयोजकातर्फे व्यक्त केला जात आहे. यासंबंधी प्रबोधन मंचचे जिल्हाध्यक्ष प्रा. सोमनाथ लांडगे सर यांनी सविस्तर माहिती दिली. यावेळी दिनेश दत्ता बंडगर यांनी तालुका स्तरावरील नियोजन कसे केले आहे या विषयावर मत मांडले. गणेश एडके यांनी गाव पातळीवर जाऊन मोर्चासाठी नियोजना विषयी मार्गदर्शन केले. डॉ. स्नेहा सोनकाटे म्हणाल्या की आरक्षण मिळाले नाही तर धनगरांची मते निर्णायक ठरू शकतात.

# अवकाळी पावसाने झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करावेत : पालकमंत्री संजय बनसोडे

परभणी : परभणी जिल्ह्यात मागील तीन दिवस झालेल्या अवकाळी पाऊसामुळे परभणी, गंगाखेड, जिंतूर, पाथरी, पूर्णा, पालम मानवत, सोनपेठ, सेलू तालुक्यातील सुमारे १ हजार हेक्टर क्षेत्रातील रब्बी ज्वारी, कापूस, हरभरा, फळबागा, भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देश राज्याचे क्रिडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय बनसोडे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

परभणी जिल्ह्यातील नुकसानग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या शेतात जावून पाहणी करत त्यांच्याशी संवाद साधून त्यांना धीर देण्यात यावा. तसेच अवकाळी पावसामुळे बाधित शेतीपिकांचे येत्या दोन दिवसांत वस्तुनिष्ठ पंचनामे पूर्ण करण्यात यावेत. तसेच ज्या शेतकऱ्यांनी पीकविमा काढला असेल, त्या शेतकऱ्यांनीही झालेल्या नुकसानीबाबत पीकविमा कंपनीकडे तात्काळ नोंदणी करावी. जिल्ह्यातील कोणताही नुकासनग्रस्त शेतकरी हा नुकसानीच्या मदतीपासून वंचित राहू नये याची काळजी घ्यावी. शासन सदैव शेतकरी बांधवाच्या पाठीशी असुन, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत उपलब्ध



करुन देण्यात येणार असल्याचेही पालकमंत्री संजय बनसोडे यांनी कळविले आहे.त्यानुसार जिल्हा प्रशासनामार्फत नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यात येत असून, आज पुर्णा तालुक्यात जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीची शेतात जावून पाहणी केली. यावेळी उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर यांच्यासह संबंधीत विभागाचे अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# अक्कलकोट बंद सेतु कार्यालयामुळे लोकांचे गैरसोय लवकरात लवकर चालु करावे अन्यथा आंदोलन : अविनाश मडिखांबे

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट येथील सेतु कार्याल बंद असल्याने सामान्य लोकांचे अतोनात हाल होत आहे. लवकरात लवकर चालु करण्यात यावे अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे ता अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी केली आहे.



सेतू कार्यालय बंद असल्याने तालुक्यातील वयोवृध्द,अंध-अपंग,महिलांना व शाळकरी मुलांना विविध दाखले व कागदोपत्रासाठी इकडे तिकडे वणवण फिरावे लागत आहे. त्यामुळे संबधीत सेतू कार्यालय जातीने लक्ष घालून सुरु करुन सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यात यावे,तरच तालुक्यातील वयोवृध्द, निराधार,अंध-अपंग नागरीकांना न्याय मिळेल.सेतू कार्यालय चालु नसल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.त्यामुळे सेतू कार्यालय चालु करण्यात यावे.अन्यथा रिपाइं च्या वतीने आंदोलन छेडण्याचा इशारा अविनाश मडिखांबे यांनी एका प्रशीध्द पत्रकाद्वारे केलीआहे.या पत्रावर रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,शहर अध्यक्ष अजय मुकणार,कार्याध्यक्ष अंबादास गायकवाड आणता सचिव राजु भगळे,शुभम मडिखांबे,यांच्या सह्या आहे.

# वज्रेश्वरी महाविद्यालयात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा

भिवंडी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील अंबिकाबाई जाधव महिला महाविद्यालय, वज्रेश्र्वरी येथील महिला महाविद्यालयामध्ये दिनांक २६ नोव्हेंबर रोजी 'संविधान दिन' साजरा करण्यात आला.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य महादेव कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करून शपथ घेण्यात देण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य कांबळे यांनी, संविधान म्हणजे या जगाला शांतता, सुव्यवस्था, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता मिळून देणारी व्यवस्था म्हणजे संविधान अशा शब्दात विद्यार्थिनींना संविधानाचे महत्व पटवून दिले. प्रा. भावेश करपट यांनी विद्यार्थिनींना संविधानाची निर्मिती, संविधानाची गरज, संविधानाच्या कायद्याचे पालन आणि जतन कसे करावे याबाबत माहिती दिली तर आय. क्यू. ए. सी. प्रमुख डॉ.कल्याणी शेजवळ यांनी विद्यार्थिनींना संविधानामुळे आपल्याला कोणकोणत्या प्रकारचे हक्क आणि अधिकार प्राप्त झालेले आहेत आणि त्यामुळे महिला म्हणून आपण कशा



प्रकारचे सुरक्षित आणि संरक्षित जीवन जगू शकतो याची माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील आय.क्यू.ए.सी. विभागाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आभार प्रा. स्वप्नांकिता कांबळे यांनी व्यक्त केले.यावेळी महाविद्यालयीन सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या.

# माजी मंत्री विजयकुमार देशमुख यांच्या विशेष प्रयत्नातून मंजुर झालेल्या बॉबी सास्कृतिक भवनाचा आज भूमिपूजन समारंभ

सोलापूर/महेश गायकवाड : सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक ४ मध्ये माजी मंत्री तथा सोलापूर शहर उत्तर चे आमदार विजयकुमार देशमुख यांच्या विशेष प्रयत्नातून आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेतून मंजुर झालेल्या बॉबी सांस्कृतिक भवनाचा भूमिपूजन समारंभ आज गुरुवार दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वाजता माजी मंत्री आणि शहर उत्तर चे लोकप्रिय आमदार विजयकुमार देशमुख मालक यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती प्रभाग क्रमांक ४ च्या लोकप्रिय नगरसेविका वंदनाताई गायकवाड आणि बॉबी ग्रुप चे अध्यक्ष अजित भाऊ गायकवाड यांनी दिली .विजयकुमार देशमुख यांच्या विशेष





प्रयत्नातून आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेतून मंजुर झालेल्या या सांस्कृतिक भवनात च्या ठिकाणीं व्यायाम शाळा तसेच दुसऱ्या मजल्यावर वाचनालय आणि विविध समाजपयोगी वास्तू बांधल्या जाणार आहेत

याच कार्यक्रमात प्रभागातील विविध ठिकाणी काँक्रीटीकरण कामाचे ही उद्घाटन करण्यात येणार आहे, न्यु बुधवार पेठ कस्तुरबा पाण्याच्या टाकीजवळ, येथे हा कार्यक्रम होणार असुन या कार्यक्रमाला प्रभागातील सर्व नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन बॉबी ग्रुप च्या वतीने अजित भाऊ गायकवाड व मित्र परिवार यांच्या वतीने सुयश महेश गायकवाड व मित्र परिवार यांनी केले आहे.

# उजनी धरण आता ३२ टक्क्यांवर

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर, पुणे, नगर या जिल्ह्यांसह धाराशिव शहरासाठी वरदान ठरलेल्या उजनी धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होऊ लागला आहे. सध्या कॅनॉलमधून शेतीसाठी पाणी सोडले जात असून १५ डिसेंबरपर्यंत ते पाणी सुरूच राहणार आहे. मात्र, सध्या उसाचा गाळप हंगाम सुरू असून ज्वारीला पाणी देऊन झाले आहे. उन्हाळ्यातील संभाव्य टंचाईचा विचार करता अजूनही पाणी कशासाठी व कोणासाठी सुरू आहे, असा प्रश्न्न उपस्थित केला जात आहे.

सोलापूर जिल्ह्यात सध्या माळशिरस, करमाळा, मंगळवेढा, सांगोला, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट या तालुक्यातील सद्य:स्थिती चिंताजनक आहे. यंदा जमिनीची पाणीपातळी एक मीटरने खोलवर गेली आहे.पावसाळ्यात उजनी धरण केवळ ६६ टक्केच भरले. मध्यम प्रकल्पांनी तळ गाठला असून लघू प्रकल्प कोरडेठाक आहेत. अशी चिंताजनक स्थिती असतानाही उजनीतील पाणी एका महिन्यातच ३० टक्के संपले आहे. त्यामुळे डिसेंबर ते जून या सात महिन्यात किती पाणी लागेल आणि जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची, जनावरे व शेतीच्या पाण्याची स्थिती असू शकेल, याचा अंदाज प्रशासनाला नसावा, हे दुर्दैवच.